जिल्हाधिकारी नागपूर यांचे कार्यालय,नागपूर विभाग,नागपूर

रामाक्र-२३३/एनएपी-३४/२०१६-१७
जा.क्र./प्रस्तु/जिल्हाधिकारी/कावि-४९२/१७
जिल्हाधिकारी यांचे कार्यालय, नागपूर
दिनांक- ०५/०५/२०१७

परिशिष्ट "ब"

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता,१९६६-च्या कलम-४२-अ मधील तरतुदीन्वये नियोजन प्रधिकरणाने बांधकाम/विकास परवानगी दिली आहे, अशा जमीनीच्या भोगवटदारास द्यावयाचा सनदेचा नमुना.

ज्याअर्थी, जिल्हा–**नागपूर**, तालूका–**नागपूर(ग्रामीण)**, गांव–**देवापूर** च्या शेत सर्व्हे क्रमांक–**०६**, आराजी **०.८५** हे आर, प.हं.नं. **७७** जमीनीच्या भोगवटादाराने **महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ४२-अ** च्या तरतुदीन्वये **रहिवास**/वाणिज्य/औद्योगिक अकृषक प्रयोजनासाठी सदर जमीनीचा विकास करण्यास **कार्यकारी अभियंता (मेट्रो), ना सु प्र, नागपूर** यांचे पत्र क्रमांक **का.अभि.(मेट्रो)/इमा.अभि.-(मेट्रो-२)/७५५८** दिनांक **२०/०२/२०१७** अन्वये **विकास**/बांधकाम परवानगी प्राप्त केली आहे. ज्यासंबधी नियोजन प्रधिकरणाने मंजूर केलेला नकाशा या सनदेसोबत संलग्न आहे. मंजूर अभिन्यासाच्या क्षेत्राचे विवरण खालील प्रमाणे आहे.

1	GROSS AREA UNDER LAYOUT	:-	8500.00 Sq. M.
2	AREA UNDER OPEN SPACE	:-	854.38 Sq. M.
3	AREA UNDER AMENITY SPACE	:-	854.69 Sq. M.
4	AREA UNDER APPROACH ROAD & VEHICULAR ROAD	:-	950.16 Sq. M.
5	AREA UNDER SERVICE ROAD/ROAD WIDENING AS PER CLAUSE 24.1	:-	1650.15 Sq. M.
5	AREA UNDER RESIDENTIAL PLOTS	:-	4190.62 Sq. M.
6	TOTAL LAND AREA UNDER LAYOUT	:-	8500.00 Sq. M.

ज्याअर्थी, उक्त जमीनीच्या भोगवटादाराने शासनाला, उक्त संहितेच्या **कलम ४७-अ** नुसार देय रुपांतरण कराची व वर नमुद अकृषक प्रयोजनार्थ वापरापोटी आकारणीची रक्कम पुढील प्रमाणे निर्धारित करण्यांत येते.

एकूण क्षेत्रफळ **८५०० चौ मीटर** पैकी अकृषक सारा आकारणी करावयाचे क्षेत्र **Area under plot + Area Under Amenity Space** म्हणजेच **४१९०.६२ + ८५४.६९ = ५०४५.३१**

Scanned with CamScanner

चौ.मीटरला निवासी वापराकरीता ५ पैसे प्रति चौ.मीटर याप्रमाणे अकृषक महसूल कर रुपये २५२/- , ग्राम पंचायत सेस कर अकृषक कराएवढा रु. २५२/-, जिल्हा परिषद सेस सारा ७ पट अकृषक कराच्या रु. १७६४/-, परावर्तीत कर अकृषक सा-याचे ५ पट म्हणजेच रु. १२६०/- असे एकूण रुपये ३५२८/- आकारणी निर्धारित होते.

त्याअर्थी आता, उक्त संहितेमधील तरतूदीच्या आणि तदून्वये करण्यांत आलेल्या नियमांच्या तरतूदीनुसार आणि खालील शर्तींना अधीन राहून उपरोक्त जमीनीच्या भोगवटादारास सदर नियोजन प्राधिका-यावर वर उल्लेखित विकास/बांधकाम परवानगीच्या अनुषंगाने सदर जमीनीवर अनुज्ञेय करण्यांत आलेल्या अकृषक वापरापोटी उक्त संहितेच्या **कलम ४२-अ** अन्वये ही सनद देण्यांत येत आहे.

१)आकारणी :- उक्त जमीनीचा भोगवटदार उक्त जमीनीच्या संबंधात या आगोदर वसूली योग्य असलेल्या आकराणीऐवजी वर उल्लेखित विकास/बांधकाम परवानगी प्राप्त झाल्यापासून दिनांक **३१ जूलै २०१७ (वर्ष)** रोजी संपणा-या हमीच्या कालावधीत शासनाला प्रत्येक वर्षी रुपये **२५२/- (दोनशे बावन्न रु. फक्त)** या दराने परिगणित होणारी वार्षिक आकाराणी देईल आणि उक्त कालावधी संपल्यानंतर, उक्त संहिते अन्वये जिल्हाधिका-याकडून, वेळोवेळी निश्चित करण्यांत येईल. अशी सुधारित आकारणी देईल.

२)उक्त जमीनीचा भोगवटदार उक्त जमीनीवर वसूली योग्य असलेली सर्व कर, दर आणि उपकर भरील.

३) वरीलप्रमाणे मंजूर केलेल्या वापरामध्ये किंवा वापराच्या क्षेत्रामध्ये नियोजन प्रधिकरणाच्या पूर्व मंजूरी शिवाय कोणत्याही बदल करु नये व ही सनद निर्गमित झाल्यानंतर नियोजन प्रधिकरणाच्या पूर्व मान्यातेने सदर जमीनीच्या वापराच्या क्षेत्रामध्ये कोणताही बदल झाल्यास त्याची माहिती,असा बदल नियोजन प्रधिकरणाकडून मंजूर झाल्यापासून ३० दिवसांच्या आत जिल्हाधिकारी यांना देणे भोगवटादारावर बंधनकारक राहील.

४) उक्त जमीनीच्या भोगवटादाराने पूर्वगामी शर्तीपेकी कोणत्याही शर्तीचे उल्लांघन केल्यास जिल्हाधिका-यास, उक्त संहितेच्या आणि तदन्वये करण्यांत आलेल्या नियमांच्या तरतुदीन्वये जी भरण्यास उपयोगकर्ता दायी असेल अशी इतर कोणत्याही शास्तीस बाधा न आणता त्यास योग्य वाटेल अशी आकाराणी भरल्यावर आणि **कलम ३२९ च्या पोट कलम** (२) च्या अधीनतेने,त्यास योग्य वाटेल एवढा दंड भरल्यानंतर उक्त जमीन भोगवटदार याच्या वहीवाटीत असल्याचे चालू ठेवता येईल. त्याची साक्ष म्हणून नागपूर जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यांनी या ठिकाणी महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या वतीने स्वाक्षरी केली आहे. आणि त्यांच्या पदाची मोहोर लावली आहे.

Scanned with CamScanner

अर्जदाराने सुध्दा १८/०३/२०१७, रोजी त्यांच्या स्वाक्षरी केलेली आहे.

(भोगवटादाराची स्वाक्षरी)

निवी इन्फ्रास्ट्रक्चर तर्फे प्रो प्रा
श्री रोहन विनायक रारोकर

(साक्षीदारांची स्वाक्षरी व पदनाम)

अ)
श्री विनोद फळके
ब)
श्री

(साक्षीदारांची स्वाक्षरी व पदनाम)

अ)
श्री विनोद फळके
ब)
श्री

आम्ही जाहीर करतो की, ज्याने सनदेवर स्वत: **निवी इन्फ्रास्ट्रक्चर तर्फे प्रो प्रा श्री रोहन विनायक रारोकर** यांनी स्वाक्षरी केलेली आहे. ती अ व ब व्यक्ती, तीच व्यक्ती आहे आणि त्याने या ठिकाणी आमच्या समक्ष त्यांची स्वाक्षरी केलेली आहे.

जिल्हाधिकारी नागपूर

(सचिन कुर्वे)
जिल्हाधिकारी नागपूर

प्रतिलीपी :-

१) **कार्यकारी अभियंता (मेट्रो), ना सु प्र, नागपूर** यांना माहिती करिता अग्रेषित.
२) **तहसिलदार हिंगणा** यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस रवाना
३) तलाठी- **देवापूर**, तालूका- **हिंगणा** माहिती व योग्य कार्यवाहीस रवाना
४) **सह जिल्हा निबंधक (ग्रामीण), प्रशासकिय इमारत क्र. २, नागपूर, यांना माहिती करिता**
५) **निवी इन्फ्रास्ट्रक्चर तर्फे प्रो प्रा श्री रोहन विनायक रारोकर** यांना माहिती तथा उपरोक्त अटी व शर्तींच्या पूर्तता व अंमलबजावणी करण्यासाठी तसेच अकृषक कराची रक्कम रु **२१०१४/-** चालानच्या स्वरुपात शासनजमा करण्यासाठी अग्रेषित.

(सचिन कुर्वे)
जिल्हाधिकारी नागपूर

Scanned with CamScanner